# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६१२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२४/०९/२०१६

**१) बनावटी एटीएम तयार करुन एटीएम मधुन पैशे चोरुन बॅकेची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०५/०१६ चे २३.४७ ते १८/०५/१६ चे ००.०३ मी. ३८ सेकंद वा. दर. यातील एसबीआय शाखा लाखनी येथील खात्यातुन कोणीतरी अज्ञात आरोपीने बनावटी एटीएम कार्ड चा वापर केला व खात्यात जमा असलेल्या रक्कमे मधुन विकासपुरी नवी दिल्ली येथील एटीम मधुन नमुद खात्यातील ८०,०००/—रु. काढुन बॅकेची फसवणुक केली असे फिर्यादी प्रशांत पुरुषोत्तम ईश्वरकर वय २६ वर्ष रा. फेन्डस कॉलोनी भंडारा यांच्या चौकशी वरुन व आज रोजी दिलेल्या लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(ब)(ड)(क)माहिती तंत्रज्ञान अधिनीयम. २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. कुरील पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) सेवा सहकारी संस्थेमधुन रासायणीक खते, बियाने, औषधे व पैश्याची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०१/०४/२०१२ ते ३१/०९/२०१५ पर्यत. यातील आरोपी क्र. १ (मृतक) व आरोपी क्र. २ हे विवीध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. पवनी येथे खाजगी नौकरी करीत असतांना संस्थेचे बनावट रेकॉर्ड तयार करुन ते खरे आहे असे भासवुन संस्थेतील रासायणीक खते, बियाने, औषधे व पैश्याची अफरातफर करुन संस्थेचे एकुण १५,६,८९४/—रु. ८० पैसे इतक्या रुपयाची फसवणुक केली व आरोपी क्र. ३ ते १५ हे संस्थेचे स्थापक असतांना यांनी आरोपी क्र. १ व २ यांना सहकार्य केले असे फिर्यादी सचिन सुरजलाल मते वय ३६ वर्ष, रा. भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४०८,४२०,४६५,४६८,४७८,३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल अपघातात चार जखमी . :—**

दिनांक. २३/०९/२०१६ रोजी १२.४५ वा. दर. यातील आरोपी टिव्हीएस मोटार सायकलचा चालक व डिक्सकव्हर बजाज मोटार सायकल चा चालक यांनी आपआपल्या ताब्यातील मोटार सायकल बेदरकारपने, भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन यातील चालक— तारा सुकल केळझरकर व सोबत सुकरु किसन केळझरकर दोन्ही रा. ईटान, चालक —अशोक केशव बन्सोड व सोबत सुमित्राबाई रामचंद्र ठलाल दोन्ही रा. कुर्झा हे जखमी होण्यास तसेच स्वतः जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने चौकशी अहवाल व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**४) नदीच्या पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक. २३/०९/२०१६ चे १३.०० ते १६.३० वा. दर. यातील मृतक मनोज देवाजी खांडेकर वय ४५ वर्ष, रा. खंडाळा याचा भाऊ हा घरी हजर असतांना दुपारी अंदाजे १३.३० वा. दर. त्याच्या गावचा हेमराज याने माहीती दिली की तुझा लहान भाऊ मृतक हा चुलबंद नदीच्या पाण्यात आंघोळ करीत असतांनी नदीचे खोल पाण्यात बुडुन मरण पावला व तो दिसत नाही त्यावरुन फिर्यादी हे स्वतः चुलबंद नदीवर जावुन पाहणी केली असता भाऊ मिळुन आल्याने मृतक हा नदीचे पाण्यात आंघोळ करतांना बुडुन मरण पावला आहे असे फिर्यादी रोषन देवाजी खांडेकर वय ५० वर्ष, रा. खंडाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. साकोली हे करित आहेत.

**५) विज अंगावर पडुन औषधोपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :–**

दिंनाक. १३/०९/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील मृतक फिर्यादी सौ. प्रियनंदा श्रीकृष्ण भुरे वय ३८ वर्ष, रा. सिरसघाट ही दि. १३/०९/२०१६ चे १६.३० वा. दर. जावेद खान यांचे शेतात काम करीत असतांना विज कडाडुन तीचे अंगावर पडल्याने तीस औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. १३/०९/२०१६ चे २०.३० वा मरण पावल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र टपाला व्दारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना निकोडे पोस्टे कारधा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नबंरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करित आहेत.

**६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २३/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १२१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व ईतर वाहनांवरती १०८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.